५ एप्रिल 2019, सकाळ

अवतीभवती



कोल्हापूर : पडवळवाडी प्राथमिक शाळेला पुस्तके प्रदान करताना बी. डी. चेचर. सोबत अन्य मान्यवर.

# पडवळवाडी शाळेला ५ हजार पुस्तके प्रदान

कोल्हापूर : कमला कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे पडवळवाडी (ता. करवीर) गाव दत्तक घेतले आहे. शाळेस क्रीडा शिक्षक संजय पाटील यांच्याकडून पाच हजार पुस्तके भेट दिली. प्रमुख पाहुणे म्हणून 'सकाळ'चे छायाचित्रकार बी. डी. चेचर होते. या वेळी ते म्हणाले, ''जीवनाला पुस्तके दीप दर्शन करतात. पुस्तकातून माणूस घडतो. पुस्तके ही जीवनात सजगता आणण्याचे काम करतात म्हणून मुलांनी सकारात्मक वृत्तीने संवर्धन करावे.'' या वेळी प्रा. अनिल घस्ते, प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी मुख्याध्यापक संजय नलवडे, यशवंत चौगुले, आनंदा बोडके, नंदिनी कुंभार, नानासाहेब गिरी उपस्थित होते.